म. ग्रं. सं. ठा

विषय

सं. नं.

नोंद ७३

म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक नारो आप्पाजी गोडबोले

पुस्तकाचें नांव सहदेव भल्लाचें

सन

ना. गो.

# सहदेवमताचें ज्योतिषरत्न

हें नवीन पुस्तक
लोक कल्याणार्थ

## नारो आपाजी गोडबोले

यांनीं
तयार केलेलें. सा. ग्रं. ७० / २
त्यांचे

'ज्ञानप्रसारक' छापखान्यांत छापिलें.

### पुणें पेठ सदाशिव.

### आवृत्ति पांचवी.

तारीख १५ माहे अक्टूबर १८८६
इसवी.

### किंमत ०।१० आणे.

सन १८६७ चा आक्ट २५ व सन १८४७ चा आक्ट २० प्रमाणें या पुस्तकावर सर्व प्रकारचा हक्क छापणारानें आपणाकडे ठेविला आहे.

# प्रस्तावना.

## सहदेव.

शूद्रजातींत अडाखेदार असा हा एक उत्तम ज्योतिषी होऊन गेला. त्याच्या विषयींची दंतकथा अशी सांगतात कीं,– कोणी मोठा ज्योतिषी ब्राह्मण आपल्यास उत्कृष्ट ज्योतिषविद्यानिपुण पुत्र व्हावा म्हणून योग पहात असतां त्यास तसा योग सांपडला, परंतु तो बराच अवधीचा होता म्हणून जरी ब्राह्मणास त्याचें पक्कें स्मरण होतें तरीं एकदां तो कांहीं कामानिमित्त परगांवीं गेल्यानें त्यास त्याची विस्मृति झाली. पुढें परगांवीं असतां त्यास एकाएकीं स्मरण झालें कीं, तो योग उद्यांच आहे. म्हणून त्यानें काम होतें तें तसेंच ठेविलें. व अस्तमानीं गांवास पोंचूं अशा बेतानें तो पहांटेस निघाला. परंतु, मार्गांत त्यास त्या दिवशीं इतका पाऊस लागला कीं, तो जेमतेम गांवाजवळ नदी होती तेथपर्यंत आला. आणि पाहतो तर नदी फूं करीत पात्रमर्यादा सोडून वाहात आहे. तेव्हां आतां काय करावें अशी त्यास चिंता पडली. परंतु नदी भरल्यामुळें त्याचा कांहीं उपाय चालेना म्हणून तो त्याच खेड्यांत शूद्र जातीच्या दोघी सासवासुना राहात होत्या. त्यांच्या झोंपडींत पहिल्या ओसरीवर जाऊन उतरला. या गोष्टीस प्रहर रात्र लोटली. ब्राह्मणास स्वस्थ झोंप येईना. व वारंवार उसासे टाकून रडकेंच म्हणे कीं, मर्जी ईश्वराची. याप्रमाणें तो दोन तीन वेळा बोलला तें घरच्या वृद्ध म्हातारीनें ऐकिलें. म्हणून ती त्याजवळ येऊन पुसूं लागली. जोशीबावा, तुम्ही चांगले सूज्ञ असून आज असे बरळतां याचें कारण काय? त्यानें उत्तर केलें तें माझें मीच जाणें. तथापि आज असा योग आ-न लगबग करून निघालों असतां ही, अखेर घर माझ्या हातीं आलें नाहीं म्हणून खेद वाटतो. म्हातारी म्हणाली असें असेल तर व इच्छेस येईल तर ही कृपा माझ्या सुनेवर कां करीतां? तिला सेवेस हजर करतें. वस्तुतः तुमचें कुटुंब तर आज तुम्हास अंतरलेंच आहे तेव्हां ब्राह्मणानें क्षणभर [illegible]रून बरें म्हटलें. तोच त्या शूद्र स्त्रीस गर्भ राहून झालेला हा पुत्र होय. याचा असण्याचा [illegible]त्र सपजत नाहीं.

यास जन्मापासून ज्योतिषविद्या इतकी स्फुरद्रूप झाली होती म्हणून सांगतात कीं, यानें जें जें सहज बोलावें तें तें अनुभवासच यावें. व ज्योतिषशास्त्रास ही मिळालें यानें उपनांव. भाडळे होतें असें ऐकिवांत येतें. व हा मोंगलाईंत राहात असे. त्यामुळें याची कांहीं कविता मराठींत व कांहीं हिंदुस्थानींत अशी आहे. भाडळे उपनावाच्या संबंधानें आपल्या आईशीं बोलतांना कित्येक प्रसंगीं त्यानें जरी तिला भाडळी म्हटलें आहे तरी तें तिचें नांवच होतें असें समजूं नये.

याचा समग्र ग्रंथ कोठें आढळत नाहीं. परंतु कोठें कोठें स्फुट प्रकरणें मिळालीं तीं बहुत दिवसांपासून संग्रह केलेलीं पूर्वीं एकत्र करून छापिलीं होतीं त्याच्या प्रती संपल्यामुळें तो पहिला ग्रंथ सुधारून नवीन संग्रह झालेला त्यांत मिळवून ही चवथी आवृत्ति छापिली आहे त्यांत न्यूनाधिक्य होईल तें वाचकांनीं पूर्ण कृपेनें कळविलें असतां ग्रंथकर्ता त्यांचा फार आभारी होईल.

ता. १७ माहे जून १८७७ — नारो आपाजी गोडबोले.

## पांचवे आवृत्तीची प्रस्तावना.

या आवृत्तींत विषय अनुक्रमानें घेऊन प्रकरणवार जुळणी केली आहे व नवीन मिळालेला विषय यांत मिळवून व पूर्वीचे आवृत्तीचे हस्तदोष शुद्ध करून ही पांचवी आवृत्ति छापिली [illegible] कळावें

अलंकार.

भास्कर नारायण गोडबोले.

# अनुक्रमणिका.


| विषयाचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| संवत्सर नामानि. | १ |
| साठ संवत्सरांचें फळ. | २ |
| वारफळें. | १० |
| बारा मासीं शुक्ल प्रतिपदेचें फळ. | ११ |
| शुक्ल द्वितीयेच्या चंद्राचें फळ. | १२ |
| अमावास्येचें फळ. | १३ |
| रोहिणी नक्षत्राचें फळ. | १३ |
| संक्रांतीचें फळ. | १४ |
| चंद्र सूर्याच्या खळ्याचा गुण. | १४ |
| शुक्राचें फळ. | १४ |
| शुक्राचा अस्तोदय मासफळ. | १४ |
| शुक्र कोणते द्वारें गेला तें पहाणें. | १५ |
| मंगळाचे उदयाचें फळ. | १५ |
| बृहस्पतीचा उदय. | १५ |
| मल मासांचीं फळें. | १५ |
| शीघ्र प्रसूती यंत्र. | १६ |
| हलचक्र. | १६ |
| नारीस ऋतु आला तो पहाणें. | १७ |
| वारलक्षणें. | १७ |
| तिथिलक्षणें. | १८ |
| नक्षत्र फळ. | १८ |
| राशि फळ. | १८ |
| गर्भाधानास मुहूर्त. | १८ |
| ऋतूच्या षोडश रात्रीचें शुभाशुभ फळ. | १८ |
| जन्म काळाचीं शुभाशुभ फळें. | |
| तिथि फळ. | १९ |
| कृष्ण चतुर्दशीचें फळ. | १९ |
| अमावास्येचें फळ. | १९ |
| नक्षत्र फळ. | १९ |
| जन्मकाळीं मूळ नक्षत्र कोणते लोकीं आहे तें पहाणें. | २० |
| मूळ नक्षत्रावरील जन्म फळ. | २० |
| लें कररूं जन्मलें तें पहाणें. | २१ |
| बारा मासांचीं जन्मफळें. | २१ |
| तिथींचीं जन्म फळें. | २१ |
| सात वारांचें जन्मफळ. | २१ |
| सत्तावीस नक्षत्रांचें जन्म फळ आयुष्य व अपमृत्यु. | २१ |
| अश्विनी नक्षत्रीं जन्मफळ. | २४ |
| राशी फळ. | २५ |
| आयुष्याची मर्यादा जे वेळेस प्रसूत होय ते वेळेस नक्षत्र पहाणें आदान. | २७ |
| पुरुष जातक कोष्टक. | २८ |
| स्त्री जातक कोष्टक. | २९ |
| अवकहडा परि ज्ञान. | २९ |
| घटितमान नक्षत्र परत्वें. | ३० |
| घटित मान राशि परत्वें. | ३१ |
| राशी परत्वें घातादि कोष्टक. | ३१ |
| आश्लेषा नक्षत्राचा नराकार वृक्षत्याचें जन्म फळ. | ३२ |
| दिन क्षयीं व कुयोगीं जन्माचें फळ. | ३२ |
| ज्येष्ठा नक्षत्राचें जन्म फळ. | ३२ |
| अवयवांवर नक्षत्र पडल्याचें फळ. | ३२ |
| मुलाचें नांव ठेवण्यास दिवस. | ३३ |
| मूल पाळण्यांत घालावयास दिवस. | ३३ |
| मुलाचें उष्टावण करण्यास दिवस. | ३३ |
| विद्याभ्यासास दिवस. | ३३ |
| श्मश्रु कर्मास नक्षत्रें. | ३३ |
| शेषाचें मुख कोणते दिशेस. | ३३ |
| शेषाचें फळ. | ३३ |
| गृहारंभास मास. | ३४ |
| गृहारंभास तिथि. | ३४ |
| गृहारंभास नक्षत्रें. | ३४ |

घराची भिंत बांधावयाचा मुहूर्त ········ ३४
घराचें फळ ········ ३४
घर बांधण्याचा प्रकार ········ ३४
कूर्म भिंतीचा पाया खणावयास मुहूर्त ········ ३५
घराचे खांबाचा मुहूर्त ········ ३५
द्वारचक्र ········ ३५
चरकाचा मुहूर्त ········ ३५
मुहूर्त खांबाची दिशा ········ ३६
ध्वजाचा जाती ········ ३६
विहीर खणावयास दिवस ········ ३६
दुसरा प्रकार ········ ३७
चंद्र सोना किंवा वेडा ········ ३७
चंद्र मासीचें फळ ········ ३७
गमनीं वार, नक्षत्रे वर्ज्य ········ ३७
कार्यास व गमनास शुक्र व वर्ज्य ········ ३८
घबाड मुहूर्त ········ ३८
कंटक पहाणें ········ ३८
चांद्र मानानें फिरते महिने कंटक जाणावे ३८
भद्रा कोणते दिशेस तें पहाणें ········ ३९
भद्रा कोणते लोकीं तें पहाणें ········ ३९
योगिनी कोठें तें पहाणें ········ ३९
काळ कोठें आहे तो पहाणें ········ ३९
काळ कोणते वारीं कोठें ········ ४०
गमन काळीं दुष्ट शकुन ········ ४०
गमन काळीं उत्तम शकुन ········ ४०
महा नक्षत्राचें वाहन पाहणें ········ ४१
स्त्री पुरुष नपुंसक नक्षत्रें ········ ४१
इंद्र धनुष्याचें फळ ········ ४१
पर्जन्य प्रश्न ········ ४१
दोहोरा ········ ४१
सूर्य व चंद्र नक्षत्रें ········ ४२
शेनकी करण्यास मुहूर्त ········ ४२
नेत्र स्फुरण ········ ४२
अंगस्फुरण ········ ४२
अंगछाया प्रश्न ········
वारपरत्वें स्वरशकुन ········ ५३
घोडे आणावयाचा मुहूर्त ········ ५४
नवीन वस्त्र घरास आणावयाचा मु० ········ ५४
सुवर्ण, माणिक, रत्नें मोतीं धारणास मुहूर्त ········ ५४
नवीन वस्त्र परिधानास दिवस ········ ५४
औषधें घेण्यास दिवस ········ ५४
नष्ट वस्तु प्रश्न ········ ५४
गुरूं चुकल्याचा प्रश्न ········ ५५
कार्याचा प्रश्न ········ ५५
चोराचा प्रश्न ········ ५५
अंक प्रश्न ········ ५५
दुसरा प्रकार ········ ५५
गांवास गेलियाचा प्रश्न ········ ५५
पिंगळा प्रश्न फल श्रुति ········ ५६
पिंगळा शब्द ········ ५६
पिंगळ्याचा शकुन रात्रीचा प्रकार १-२ ५६
पिंगळ्याचा प्रश्न ········ ५६
पालीचा प्रश्न ········ ५७
शिंकेचा प्रश्न ········ ५७
शिंक, पाल, जंबुक यांचा प्रश्न ········ ५७
काकस्पर्श शकुन ········ ५७
काक शब्द प्रश्न ········ ५८
अपशकुन ········ ५८
जाती भेद ········ ५८
होला घरांत गेल्याचा गुण ········ ५८
कुत्रें फड फडतें त्याचा प्रश्न ········ ५८
कर्करी कावळ्याचा प्रश्न ········ ५९
कोणते नक्षत्रावर काय कार्य करावें तें ········ ५९
कोणास काय योग्य तें ········ ५९
राज्य भंग योग ········ ५९
कोणते वारीं काय काय कामें करावीं तीं ६०
स्फुट दोहोरे ········ ६०
म्हणी ········ ६१
अधिक मास व क्षयमास यांचें कोष्टक ········ ६१

श्री

# सहदेवमताचें ज्योतिषरत्न.

## संवत्सरनामानि.

श्लोक ॥ ॥ प्रभवो विभवः शुक्लः प्रमोदोथ प्रजापतिः ॥ अंगिराः श्रीमुखो भावो युवाधातातथैवच ॥ १ ॥ ईश्वरो बहुधान्यश्च प्रमाथी विक्रमो वृषः ॥ चित्रभानुः सुभानुश्च तारणः पार्थिवोव्ययः ॥ २ ॥ सर्वजित् सर्वधारीच विरोधी विकृतिः खरः ॥ नंदनो विजयश्चैव जयो मन्मथ दुर्मुखो ॥ ३ ॥ हेमलंबी विलंबीच विकारी शार्वरीप्लवः ॥ शुभकृच्छोभनः क्रोधी विश्वावसु पराभवो ॥ ४ ॥ प्लवंगः कीलकः सौम्यः साधारण विरोधकृत् ॥ परिधावी प्रमादीच आनंदो राक्षसोनलः ५ ॥ पिंगलः कालयुक्तश्च सिद्धार्थी रौद्र दुर्मतिः ॥ दुंदुभि रुधिरोद्गारी रक्ताक्षी क्रोधनः क्षयः ॥ ६ ॥

### अर्थ:-

| | | | |
|---|---|---|---|
| १ प्रभव. | १४ विक्रम. | २७ विजय. | ४० पराभव. |
| २ विभव | १५ वृष. | २८ जय. | ४१ प्लवंग. |
| ३ शुक्ल | १६ चित्रभानु. | २९ मन्मथ. | ४२ किलक. |
| ४ प्रमोद. | १७ सुभानु. | ३० दुर्मुख. | ४३ सौम्य. |
| ५ प्रजापति. | १८ तारण. | ३१ हेमलंबी. | ४४ साधारण. |
| ६ अंगिरा. | १९ पार्थिव. | ३२ विलंबी. | ४५ विरोधकृत्. |
| ७ श्रीमुख. | २० व्यय. | ३३ विकारी. | ४६ परिधावी. |
| ८ भाव. | २१ सर्वजित्. | ३४ शार्वरी. | ४७ प्रमादी. |
| ९ युवा | २२ सर्वधारी. | ३५ प्लव. | ४८ आनंद. |
| १० धाता. | २३ विरोधी. | ३६ शुभकृत्. | ४९ राक्षस |
| ११ ईश्वर. | २४ विकृति. | ३७ शोभन. | ५० नल. |
| १२ बहुधान्य. | २५ खर. | ३८ क्रोधी. | ५१ पिंगल. |
| १३ प्रमाथी. | २६ नंदन. | ३९ विश्वावसु. | ५२ कालयुक्त |

| | | | |
|---|---|---|---|
| ५३ सिद्धार्थी. | ५५ दुर्मती. | ५७ रुधिरोद्गारी. | ५९ क्रोधन. |
| ५४ रौद्र. | ५६ दुंदुभी. | ५८ रक्ताक्षी. | ६० क्षय. |

## साठसंवत्सरांचें फळ.

**प्रभवनाम संवत्सर.—** याचा स्वामी ब्रह्मा, लोकांचा आतुरराजा, प्रजा सुखी, आणि शोभन होती, थोर महोत्साह होती, महाजन शेटे सुखी, ते वर्षी बाराही मास सुखी जाणावे, विवाह मंगलें होती. ॥ १ ॥

**विभवनामसंवत्सर.—** याचा स्वामी विष्णु, जगत्रासी, नानाविधरोग उपजती, सिंहदेशीं व पूर्वदेशीं आणि दिल्लीदेशीं लोकपीडा पावती, राज्यभंग होय, मथुरागडीं भंग होईल. ॥ २ ॥

**शुक्लनामसंवत्सर.—** याचा स्वामी महेश्वर. ते वर्षी राज्यभंग होईल, म्लेंछांसीं पीडा, परचक्रें चालतील, फाल्गुन मासीं धारण महाग होईल, उपरी राजा प्रजा सुखी. ॥ ३ ॥

**प्रमोदनामसंवत्सर.—** याचा स्वामी रवी, जगत्रासी, पीडा मध्यम, ते वर्षी पुरें उठती, ग्रामीं अरण्यें होती, वडय देश भंगती, तें मांडवगडीं वास होईल, तें पुरुष वृद्ध मरती, ते वर्षी डोंगर डोलती, ते लंगदेशीं भूमि उत्पारण होईल, हत्तीघोडे चालतील, राजांसी पीडा होईल. ॥ ४ ॥

**प्रजापतिनामसंवत्सर.—** याचा स्वामी चंद्र, प्रथम तीनमासीं अतिशोभन होती, विवाह भोजनें होती, नवखंडीं पीडा, चैत्रमास तो धारण मध्यम, वैशाख मध्यम, ज्येष्ठ आषाढ श्रावण कार्तिक मार्गशीर्ष पौष हे सहामहिने फरकेल, माघ फाल्गुन स्वस्थ होईल. ॥ ५ ॥

**अंगिरानामसंवत्सर.—** याचा स्वामी गुरु, मध्यदेशीं खंडळ मंडळ पाणी पडेल, देश भंगहोईल, कांहीं देशीं दुर्भिक्ष पडेल, चैत्रमासीं ब्रह्मा स्वामी, वैशाख मासीं रवी स्वामी, ज्येष्ठमासीं रुद्रस्वामी, आषाढ मासीं शुक्र स्वामी, श्रावण मासीं चंद्र स्वामी, भाद्रपद मासीं मंगळ स्वामी, आश्विन मासीं बुध स्वामी, कार्तिक मासीं गुरु स्वामी, मार्गशीर्ष मासीं शुक्र स्वामी, पौषमासीं शनी स्वामी, माघ मासीं राहू स्वामी, फाल्गुन मासीं केतु स्वामी. ॥ ६ ॥

**श्रीमुखनामसंवत्सर.—** याचा स्वामी बुध, देशीं सुभिक्ष जाणा, राजा प्रजा सुखी, चैत्र फरकेल, वैशाखीं महाग होईल, ज्येष्ठ मासीं सवंगाई होईल, आषाढमास फरकेल, श्रावण मासीं गोरस फरकेल, महाग होतील आ-

णि महाजनासीं पीडा होईल, भाद्रपद व आश्विन मासीं दुष्काळ पडेल, कार्तिक आदिकरून मास ५ षट्कर्म होतील. ॥७॥

**भाव नामसंवत्सर:-** याचा स्वामी गुरु, पृथ्वीवर मेघ उत्पन्न होईल. चैत्र वैशाख स्वस्थ, ज्येष्ठ आषाढ श्रावण मागुती फरकेल, आश्विन कार्तिक मार्गशीर्ष फरकेल, हाळदी फरकेल, ते वरुषीं किडे येती, मुलतानदेशीं राजयासीं आडणी पीडा होईल, तूप लवंग साखर महाग होईल. ८

**युवानामसंवत्सर:-** याचा स्वामी शुक्र, पहिले मासीं भूमी कंप होईल, पृथ्वी वरी जळपूर्ण होईल, उन्हाळा नद्या वाहतील, आषाढ मासीं वायू सबळ, श्रावण मासीं अन्न फरकेल, भाद्रपद मासीं मेघ वर्षतील, आश्विन मास मंद, कार्तिक स्वस्थ, मार्गशीर्षमासीं एखादें विघ्न होईल, गौडदेशीं अथवा तैलंग किंवा मुलतान देशीं पीडा होईल. ॥९॥

**धातृ नामसंवत्सर:-** याचा स्वामी शनी, चैत्र वैशाख रोग बहू उपजतील, ज्येष्ठ आषाढ मासीं तूपतेल महाग होईल, श्रावण मासीं दक्षिणेस मेघ वर्षतील, दक्षिणेस ब्राह्मण पीडा पावतील, राजे यांस पीडा होईल, भादवा सर्वंगाई होईल, आश्विन मासीं उंदीर येतील, ते उंदीर पांच महिने राहतील, कार्तिक मार्गशीर्ष मेघ वर्षतील, पौष माघ फरकेल, गुजराथेंत सोरट पीडा होईल, इतुकें धातानामसंवत्सराचें फल आहे. ॥१०॥

**ईश्वरनामसंवत्सर:-** याचा स्वामी राहू, पृथ्वी तळ पडेल, पूर्व दिशेसीं उंदीर येतील, दिल्लीदेशीं आरवाडी पडेल, चतुष्पादांसीं पीडा होईल, पश्चिम देशीं राजीक होईल, चैत्र मास मंदेल, वैशाख फरकेल. ॥११॥

**बहुधान्यनामसंवत्सर:-** याचा स्वामी केतू, पश्चिम दिशेस दुर्भिक्ष पडेल, दक्षिण दिशेस राजीक भारी होईल, उत्तर दिशेस माघ मासीं पीडा होईल, पूर्व दिशेसी भय होईल, चैत्र वैशाख स्वस्थ होईल, ज्येष्ठ आषाढ श्रावण भाद्रपद मंदेल, आश्विन मासीं मेघ वर्षतील, धान्य संग्रह कीजे. १२

**प्रमाथीनामसंवत्सर:-** याचा स्वामी रवी, चैत्र वैशाख ज्येष्ठ आषाढ हे चार मास मंदेल आणि राजविग्रह कष्ट होतील, शरा बक्षूत वाजेल, श्रावण भाद्रपद धान्यासी धारण होईल, आश्विनमासीं मेघ वर्षतील, सर्वधान्याचा नाश होईल, ऐसें अरिष्ट भारी होईल, देशखेडीं उद्वस होतील. ॥१३॥

**विक्रमनामसंवत्सर-** याचा स्वामी चंद्र, तेव्हां राजी प्रजा सुखी, अति मेघ वर्षतील, वैशाखीं अरिष्टें होतील, आणि भूमि कंप होईल, जगन्ना

सीं पीडा होईल, ज्येष्ठमासा उपरी दुर्भिक्ष पडेल, आषाढीं वर्षाव होतील, श्रावण भाद्रपद आश्विन कार्तिक मार्गशीर्ष पौष माघ फाल्गुन हे आठ महिने धान्य स्वस्थ होईल. ॥१४॥

**वृषनामसंवत्सर**— याचा स्वामी भौम, अतिशोभनें होती, वर्षाव बरवा होईल, घरोघरीं आनंद होतील, गुढिया उभारतील, ते वर्षीं चणे महाग होय. ॥१५॥

**चित्रभानुनामसंवत्सर**— याचा स्वामी बुध, प्रजा महाजन सुखी, मेघ उदंड वर्षतील, धान्य संग्रह कीजे, चैत्र वैशाख मंद, ज्येष्ठ आषाढ श्रावण फरकेल, भाद्रपद आश्विन कार्तिक अति दुष्काळ पडेल, मार्गशीर्ष पौष मंद, भय उपजेल, उत्पात होईल, माघ फाल्गुन बरवें असे. १६

**सुभानुनामसंवत्सर**— याचा स्वामी गुरु, प्रजा सुखी होतील, पूर्वदिशेस पीडा होईल, चैत्र मास फरकेल, वैशाख ज्येष्ठ मंद, आषाढ श्रावण महर्गता होईल, भाद्वा मागुती फरकेल, आश्विन कार्तिक मार्गशीर्ष हे तीन मध्यम, राजा प्रजासीं रोग उपजतील, बहुत उत्पात होईल, पौष माघ फाल्गुन हे तीन मास बरवे. ॥१७॥

**तारणनामसंवत्सर**— याचा स्वामी शुक्र, वारा अति वाजेल, पृथ्वी उद्वस होईल, चैत्रमासीं रस महाग होतील, गारा बहुत पडतील, थोर उत्पात होईल, पूर्व दिशा व दक्षिण दिशा यांत थोर उत्पात होईल, वैशाख मासीं अमदानी होईल, धान्य संग्रह कीजे, ज्येष्ठ मासीं वायू प्रबळ, आषाढ श्रावण फरकेल, श्रावण १५ दिवस व भाद्रपद १५ दिवस असा एक महिना आगी भय होईल, राजे संग्राम करतील, पूर्व दिशेचे सर्व म्लेंछ राजांचा क्षय होईल, पौषमासीं मोठें युद्ध होईल, पृथ्वीत आकांत होईल, नगरें ग्रामें मारतील, मग भूमिकंप होईल, माघ फाल्गुन राजे पीडिती. ॥१८॥

**पार्थिवनामसंवत्सर**— याचा स्वामी शनी, अल्प मेघ वर्षतील, धान्य संग्रह कीजे, उत्पात होतील, राजा मरेल. चैत्रमासीं गारा पडतील, वैशाख मासीं अल्प मेघ वर्षतील, ज्येष्ठ आषाढ हे बरवे, मागुती श्रावणीं अल्पमेघ वर्षतील, भाद्वा राजे प्रबळ, आश्वीन मासीं मेघ वर्षतील, कार्तिक मार्गशीर्ष मंद, पौष माहो फरकेल, फाल्गुन स्वस्थ होईल. ॥१९॥

**[व्यय]नामसंवत्सर**— याचा स्वामी राहू, गुर्जर देशीं दुर्भिक्ष पडेल,

देश उद्धस होतील, राजविग्रह होईल, प्रजांसी ठाव बसायासीं नाहीं, आणीक मरी येईल. ॥ २०॥

**सर्वजित्नामसंवत्सर** :— याचा स्वामी ब्रह्मा, मेघ प्रबळ वर्षतील, नवी मुद्रा पडेल, राजा प्रजा सुखी, धान्य सवंग होईल, लवण तेल तूप या वस्तूंसी द्विगुण, कार्तिक सुभिक्ष पडेल, मार्गशीर्ष पोष माघ मेघ वर्षतील, फाल्गुन स्वस्थ होईल. ॥ २१॥

**सर्वधारीनामसंवत्सर** :— याचा स्वामी विष्णु, राजा प्रजा सुखी, देवांसीं पूजने होती, चैत्र मास फरकेल, वैशाख ज्येष्ठ मंद, दक्षिणेसी महर्गता होईल, जनासीं पीडा होईल, प्रधानासीं व राजासीं विरोध पडेल, आषाढीं वर्षाव होईल, श्रावण फरकेल, भादवा मंद, अति वर्षाव होईल, सर्व जन सुखी होतील. ॥ २२॥

**विरोधीनामसंवत्सर** :— याचा स्वामी महेश, चैत्र मास मंद, भादवा उत्पात होईल, आश्वीन मासीं मेघ वर्षतील, कार्तिक स्वस्थ, हळदी जिरें पिंपळी कंदमूल लवंग हे अधिक महाग होईल, याचा संग्रह कीजे. २३

**विकृतीनामसंवत्सर** :— याचा स्वामी रवि, शेवटीं मेघ वर्षतील, अकाळीं मेघ वर्षतील, धान्यें महाग होतील, राजविग्रह होतील, देश उद्धस होतील, चैत्रमासापासून तीन मास बरवे, आषाढ श्रावण फरकेल, भादवा अतिवर्षाव होईल, भादवा आदिकरून मास ४ बरवे, यावरी उत्पात होईल, राजासीं मृत्यु सांगे, कार्तिक मार्गशीर्ष विरोध होईल. २४

**खरनामसंवत्सर** :— याचा स्वामी चंद्र, मेघ ब्रह्माइच्छें प्रबळ वर्षतील, धान्यें सर्वही पिकतील, चैत्र मास आदिकरून मास ३ महर्गता, होईल, राजा प्रजांसीं विरुद्ध बहुत होईल, दक्षिण देश नासेल, म्लेच्छांचा संग्राम होईल, माळवा देश मांडव गड कुरुक्षेत्र कनोज मुलतान इतुके देशीं सुभिक्ष होईल, मग नगरें ग्राम बहूत वसतील. ॥ २५॥

**नंदननामसंवत्सर** :— याचा स्वामी मंगळ, ते वर्षीं महर्गता होईल, काशीमध्यें अन्न न मिळे, राजा आणि प्रजा पीडिती. धान्यासी धारण होईल, तूप महाग होईल, मध मांस स्वस्थ, चैत्रमास फरकेल, वैशाखीं वारा वाजेल, खंडळ मंडळ दुर्भिक्ष पडेल, उपरी मेघ वर्षतील, भादवा मास स्वस्थ होईल, आश्वीन मासीं पाणी पडेल, कार्तिकीं सुभिक्ष होईल. ॥ २६॥

**विजयनामसंवत्सर**:— याचा स्वामी बुध, एखादा राज भंग होईल, बहुनरोग उपजतील, चैत्र मासीं अल्पमेघ वर्षतील, वैशाख ज्येष्ठ मंद, आषाढ श्रावण फरकेल, भाद्वा वर्षाव नव्हे मरी वाहील, गुर्जर देशीं दुर्भिक्ष पडेल, आश्वीन मास फरकेल, कार्तिक मार्गशीर्ष विग्रह होईल, नसेच पौषमासीं होईल, मंद पाणी पडेल, फाल्गुन वर्षाव होईल, नवीन मुद्रा पडेल. ॥ २७ ॥

**जयनामसंवत्सर**:— याचा स्वामी गुरु, आरोग्य क्षेम प्रजा सुखी उपद्रव कांहीं न होती, उदक उदंड पडेल, चैत्र मासीं धारण होईल, वैशाख आदि करून मास ३ मंद, श्रावण दीन तीन अथवा दिवस दोन, घरें पडती, पोटीं विख उपटती, भाद्वा आदी करून मास तीन स्वस्त होईल; मरकी ज्वर पीडा मथुरा फार उपद्रव करील, मुलतान देश भंगेल, लोक व्याधी करून पीडितील. ॥ २८ ॥

**मन्मथनामसंवत्सर**:— याचा स्वामी शुक्र, महाराज्यासीं पीडा, विरोध होईल, मथुरा देशीं पीडा होईल, अति वर्षाव होईल, तें धातु स्वस्थ होतील, नानापरीचे रोग उपजतील, वैशाखीं दुर्भिक्ष पडेल, ज्येष्ठ आषाढ फरकेल, श्रावणीं स्वस्त होईल, भाद्वा मागुती फरकेल, आश्विनमासीं सुकाळ होईल, कार्तिकमासीं सर्व पडतील, मार्गशीर्ष पौष मंद, माघो फाल्गुन फरकेल. ॥ २९ ॥

**दुर्मुखनामसंवत्सर**:— याचा स्वामी शनी, अल्प मेघ वर्षतील, लोकांसीं पीडा होईल, रोग बहूत उपजतील, पश्चिमेसीं पीडा होईल, पूर्वेसीं दुर्भिक्ष पडेल, उपरी चोर उपद्रव फार करतील, चैत्र वैशाख फरकेल, श्रावण मासीं अति वायू वाजेल, भाद्रपदीं पाणी पडेल, मग स्वस्त होईल, आश्वीन मास मंद, कार्तिक मासीं लोक पीडिती, मार्गशीर्ष उत्तम बरवा, पौष माघ फाल्गुन हीं बरवा, उत्तर पंथें घुले पडतील. ॥ ३० ॥

**हेमलंबीनामसंवत्सर**:— याचा स्वामी राहू, महारोग उपजतील. देशीं उत्पात होईल, तीनमास दुर्भिक्ष पडेल, महाजनासीं पीडा होईल, चैत्र वैशाख मंद, ज्येष्ठ आषाढ श्रावण रोग उपजतील, भाद्वा आश्विन स्वस्थ असे, कार्तिक मार्गशीर्ष विरोध वाढेल, मार्गशीर्ष पासून महिने चार स्वस्त राहील. ॥ ३१ ॥

**विलंबीनामसंवत्सर**:— याचा स्वामी रवी, चैत्र आदि करून ३ मा-

स दुर्भिक्ष पडेल, बाकी नवमास सफळ होतील, विवाह मंगलादि बरवीं होतील, मारवाड देशीं विग्रह होईल, धान्यें पिकतील, आश्विन कार्तिक दुष्काळ पडेल, मार्गशीर्ष पौष मासीं सुकाळ होईल. ॥ ३२॥

**विकारी नाम संवत्सर**:- याचा स्वामी सोम, धान्यें अवघीं स्वस्थ होतील, नृप महाग होईल, राजा सुखी होईल, मेघ बहुत पडतील. धान्यें पिकतील, वैशाख ज्येष्ठीं महाग होतील, आषाढ श्रावण महा मेघ वर्षतील, धूम केतू उत्पन्न होईल, कार्तिक मार्गशीर्ष मेघ थोडा पडेल, पौष आदिकरून मास तीन बरवे. ॥३३॥

**शार्वरी नाम संवत्सर**:- याचा स्वामी मंगळ, मेघ बहुत वर्षतील, प्रजेसीं पीडा होईल, मरक होईल, माघ मासीं दुर्भिक्ष पडेल, राजे झुंज करतील, अशुद्ध मेघ मेदिनीं वर्षतील, फाल्गुन स्वस्त होईल. ॥३४॥

**प्लवंग नाम संवत्सर**:- याचा स्वामी बुध, पाणी ४ मास न पडे, मग पाणी पडेल, लोकांसीं रोग प्रगटतील, ते वरुषीं गारा पडतील, कार्तिक मासीं रसासीं धारण होईल, तैलंगण आणि श्री पर्वत यासीं पीडा होईल, वारा प्रबळ वाजेल, थोर उत्पात होईल, धूमकेतू उपजेल, श्रावण भाद्रवा वर्षाव होतील, आश्विन मासीं स्वस्त होईल, कार्तिक मार्गशीर्ष विरोध पडेल, मांडव गडीं वेढा पडेल, पौषादिकरून ३मास स्वस्त राहील. ॥३५॥

**शुभकृत नाम संवत्सर**:- याचा स्वामि गुरु, अल्प मेघ वर्षतील, राजा प्रजा सुखी, विंध्याद्री पर्वतीस अग्नी पात होईल, श्रावण आदिकरून मास तीन व कार्तिक मार्गशीर्ष पौष माघ मास ४ एकूण ७ महिने बरवें, फाल्गुनी नृप तेल लवंग गूळ इतकें महाग होईल. ॥३६॥

**शोभन नाम संवत्सर**:- याचा स्वामी शुक्र, सर्वमान तें होईल, राजा प्रजा सुखी, सर्व देशीं दुर्भिक्ष पडेल, माणसांचें मांस माणसें भक्षितील. उपरी रोगपीडा कार्तिक आदिकरून मास पांच, मागुती सुभिक्ष होईल, श्रावण मासीं रोग उपजतील. ॥ ३७॥

**क्रोधी नाम संवत्सर**:- याचा स्वामी शनी, बारा महिने राजा प्रजा सुखी, विरोध होईल, पातक बहुत होईल, चैत्र वैशाख मंद, ज्येष्ठ मास परकेल, आषाढ श्रावण महर्गता होईल, भाद्रपद आश्वीन कार्तिक क्लेशपर हीन होईल. ॥३८॥

**विश्वावसु नाम संवत्सर**:- याचा स्वामी राहू, दुर्भिक्ष पडेल, अल्प-

मेघ वर्षतील, धान्य साळी जानील. चैत्र मासीं गोपाळगडीं अग्नी लागेल, मां इव गडीं झुंज होईल, झाड खंडीं दुष्काळ पडेल, आश्विन कार्तिक मार्गशीर्ष हे तीन मास स्वस्त होईल. ॥३९॥

**पराभवनामसंवत्सर.—** याचा स्वामी केतू, बाराही मास सुभिक्ष जाण, धान्याची वृष्टि होईल, मग मेघ परिपूर्ण पडेल, जगत्र सुखी होईल. ॥४०॥

**प्लवंगनामसंवत्सर.—** याचा स्वामी ब्रह्मा, चैत्र वैशाख फरकेल, ज्येष्ठ मासीं राजेयांसीं पीडा होईल, आषाढीं अति मेघ वर्षतील, आश्विन मास स्वस्त, कार्तिकीं रोग उपजेल, मार्गशीर्षीं महर्गता होईल, पौष माघ अति-उत्सव होईल, फाल्गुन वर्षाव होईल. ॥ ४१॥

**किलकनामसंवत्सर.—** याचा स्वामी विष्णू, चैत्र फरकेल, वैशाख-मंद, इंद्रप्रस्थीं अग्नी भय. भाद्रपद मासीं मेघ वर्षतील, आश्विन मासीं-स्वस्त होईल, कार्तिक मासीं टोळ पडतील, आणि धारण फरकेल, राजपट्-णें उत्पन्न होतील. ॥४२॥

**सौम्यनामसंवत्सर.—** याचा स्वामी महेश्वर, अल्पधान्य पिकेल, चैत्र मंद, वैशाख फरकेल, ज्येष्ठ मासीं राज विरोध, आषाढ मासीं राजा प्रबळ,- श्रावणीं शीतज्वर उपजे, भाद्वा मंद, आश्विनमासीं टोळ येतील, कार्ति-क आदिकरून मासचार मंद पडेल. ॥४३॥

**साधारणनामसंवत्सर.—** याचा स्वामी रवी, चैत्र मंद, वैशाख ज्ये-ष्ठ भय होईल, आषाढीं विरोध, श्रावण भाद्वा फरकेल, आश्विन कार्तिक भय, मार्गशीर्ष संतुष्टबुद्धी, पौष माघ मेघवर्षती, फाल्गुनीं जनासीं पीडा होईल, अग्नि भय असे. ॥४४॥

**विरोधकृत् नामसंवत्सर.—** याचा स्वामी चंद्र, मारवाड देशीं दुर्भि-क्ष पडेल, कोंकण देशीं राजभय असे, चैत्र आदिकरून मास तीन मंद, आषाढ श्रावण फरकेल, भाद्वा आदिकरून मास तीन स्वस्त राहील. मा-र्गशीर्ष चतुष्पदांसी पीडा, पौष माही महाजनासी पीडा, फाल्गुनीं महाग होईल.

**परिधावीनामसंवत्सर.—** याचा स्वामी मंगळ, दुर्भिक्ष पडेल, नगरें पट्टणें उद्वस होतील, चैत्रादी करून मास चार फरकेल, वैशाख मासीं मे-घ वर्षतील. ॥४६॥

**प्रमादीनाम संवत्सर.—** याचा स्वामी बुध, कोंकण देशीं दुर्भिक्ष पडे ल, चैत्र मंद, वैशाख बरवा, ज्येष्ठ आषाढ श्रावण फरकेल, भाद्रपद मासीं

धान्य स्वस्त, आश्विन मंद, कार्तिकादि करून ४ मास फरकेल, फाल्गुन स्वस्त होईल. ॥४७॥

**आनंद नाम संवत्सर.—** याचा स्वामी गुरु, पूर्वदेशीं दुर्भिक्ष पडेल, चैत्र वैशाख स्वस्त, मेघ वर्षतील, रोग प्रगटतील, मार्गशीर्षी लोक दक्षिणेसी येती, देश उद्दस होतील, पौष माहो मेघ थोडा पडेल. फाल्गुन फरकेल.

**राक्षस नाम संवत्सर.—** याचा स्वामी शुक्र, धान्य संग्रह कीजे, चैत्र मंद, वैशाख मासीं तूपतेल फरकेल, ज्येष्ठ आषाढ अल्प मेघ वर्षतील, श्रावण भाद्वा आश्वीन मेघ परिपूर्ण होतील, कार्तिक मासीं धान्य पिकेल, मार्गशीर्षादी करून तीन मास मंद, फाल्गुन मासीं मेघ वर्षतील. ॥४९॥

**नल नाम संवत्सर.—** याचा स्वामी शनी, वैशाख मासीं उत्पात, ज्येष्ठ फरकेल, श्रावणमासीं वर्षाव होईल, आश्विन मासी दुर्भिक्ष पडेल, मार्गशीर्ष वर्षाव होईल, नंतर रोग उद्भवतील, माघमासीं वर्षाव, पौष मासीं आनंद होईल. ॥५०॥

**पिंगल नाम संवत्सर.—** याचा स्वामी राहू, कर्नाेड कलबुर्गे गौड देशीं रांगडी दिल्ली देशींची नोड देशीं मथुरादेशीं व कर्नोड देशीं पूर्वदेश तुर्क देशीं दुर्भिक्ष पडेल, राजभय होईल, मध्य देशीं सुकाळ होईल, गौड माळवा दुर्भिक्ष पडेल. ॥५१॥

**कालयुक्ताक्षी नाम संवत्सर.—** याचा स्वामी केतू, अल्प मेघ वर्षतील, आल्प धान्यें येतील, देश उद्दस होतील, अल्प वेव्हार चालतील, चैत्र वैशाख मंद, धान्य संग्रह कीजे, ज्येष्ठ मास फरकेल, आषाढ मासीं मेघ वर्षतील, धान्य फरकेल. ॥५२॥

**सिद्धार्थी नाम संवत्सर.—** याचा स्वामी ब्रह्मा, कांहीं भय नाहीं, अल्प मेघ वर्षतील, धारण फरकेल, चैत्र वैशाखीं लोकांस पीडा, ज्येष्ठ आदिकरून मास ४ वारा वाजेल, नद्या ओस पडतील, या पुढील मास अवघे बरवे. ५३

**रौद्र नाम संवत्सर.—** याचा स्वामी रुद्र, जगत्रासी रोग उद्भवतील, द्विपदां चतुष्पदांसी नाश होईल, राजभंग होईल, अथवा देश भंग होईल, बाराहीमास अति उत्पात होईल, महा देशीं नाश भय प्रगटेल. ॥५४॥

**दुर्मती नाम संवत्सर.—** याचा स्वामी मंगळ, चैत्र वैशाख स्वस्त, ज्येष्ठ आषाढ वारा वाजेल, श्रावण मासीं अति मेघ वर्षतील, भाद्वा स्वस्त, वस्त्रें महाग होतील, आश्विन मासीं जिरें स्वस्त, बाकी बाराहीमास वारा वाजेल.
५५.

**दुंदुभीनामसंवत्सर.**— याचा स्वामी बुध, मेघ अवक वर्षेनी, राजीक अवघें संपेल, सर्व रस सवंग होतील, चैत्रादी करून मास तीन स्वस्त राहील, आषाढ मास फरकेल, श्रावण भाद्वा ही फरकेल, माघ फाल्गुन वर्षाव होईल. ॥५६॥

**रुधिरोद्गारी नामसंवत्सर.**— याचा स्वामी गुरु, ज्येष्ठ आषाढ श्रावण हे तीन मास महर्गता होईल, मग खंडळ मंडळ पाणी पडेल, राजयासीं युद्धें होतील, राजविरोध होईल, दुर्भिक्ष पडेल, देश भंगले जातील, लोक बहुत पीडतील, सर्व पदार्थ महाग होय. ॥५७॥

**रक्ताक्षी नामसंवत्सर.**— याचा स्वामी शुक्र, चैत्र वैशाख फरकेल.— ज्येष्ठमासीं पाणी पडेल, आषाढीं स्वस्थ होईल, श्रावणीं वर्षाव होतील, भाद्रपद स्वस्त, आश्विन कार्तिक देशपीडा, मार्गशीर्ष पौष माहो बरवे, फाल्गुनी वारा वाजेल, हें वर्ष जनास कठीण जाईल. ॥५८॥

**क्रोधन नामसंवत्सर.**— याचा स्वामी शनी, लोकांसी पीडा होईल, वैशाखी स्वस्त, ज्येष्ठ मंद, आषाढ फरकेल, श्रावणांत अति धारण होईल, भाद्वा स्वस्त, आश्विन कार्तिक मंदे, मार्गशीर्ष स्वस्त, पौषमास फरकेल, माघ फाल्गुन जनासीं पीडा होईल, गुर्जर देशीं दुष्काळ पडेल. ॥५९॥

**क्षय नाम संवत्सर.**— याचा स्वामी राहू, चैत्र मासीं गारा पडतील, वैशाखीं उत्पात होईल, नवीमुद्रा पडेल, वारा बहुत वाजेल, श्रावणीं अतिवर्षाव होईल, भाद्वा मेघ दगड पडती, अतिवर्षाव होईल, आश्विन मासीं रोग प्रगटतील, कार्तिक मासीं स्वस्त होईल, मार्गशीर्ष आनंद होईल, पौष माहो अति वर्षाव होईल, फाल्गुन मास अतिबरवा, बंगाल देशीं अति दुष्काळ पडेल. इतुकें क्षयनाम संवत्सराचें फल आहे. ॥६०॥

## वारफलें.

**आदितवारीं पाडवा पडेतरी.**— ते वर्षीं कण महाग होय, रायासीं वैरें पडती, वारा बहुत वाजेल, अग्रधान्य थोडें पिकेल, पश्चाद्धान्य बहुत पिकेल, सुपारी होय, महर्गता होय, गायी महिषी दूध थोडें देतील, अन्नें निस्तोषजातील, वायू दुणा होय, लोकांस पीडा होईल, वृक्षासीं फळें थोडीं येतील, चोर भय होईल, उन्हाळा भारी होईल, आड विहिरी नद्या तळीं आटतील. हीं आदित वारीं पाडवा पडल्याचीं फळें जाणावीं.

**सोमवारीं पाडवा पडे तरीं —** घरोघरीं आनंद होय, दोन्हीं पिकें सुकाळ होतील, वृक्षासीं फळें बहुत येतील, तूप तेल लवण कापूस अवघ्या वस्तू सवंग होतील, धान्य कापड संग्रह कीजे, व्यापारांत बहुत लाभ असे, हीं सोमवारीं पाडवा पडल्याचीं फळें जाणावीं,

**मंगळवारीं पाडवा पडे तरीं —** त्या वर्षीं लोहपात, नक्षत्र पात होईल, राज्यासीं झुंझें होतील, राजिक अतिशय होईल, चोरांची नागवण उठेल, पाणी खंडळ मंडळ होईल, रोग व तांबेरा पडे, लोकांस रक्तदोष लागतील, लेंकरांस पीडा होईल, बाळंतिणीस अडचणी येतील, रसधातु— सोनें रुपें हीं सवंग होतील हीं मंगळवारीं पाडवा पडल्याचीं फळें जाणावीं.

**बुधवारीं पाडवा पडे तरीं —** पीक पाणी बरें होय, राजा प्रजा सुखी, धान्य रसधातू सवंग होय, अवघ्यांस आनंद होईल, गायी हत्ती घोडीं ही सर्व सवंग होतील, हीं बुधवारीं पाडवा पडल्याचीं फळें जाणावीं.

**बृहस्पतवारीं पाडवा पडे तरीं —** पीक पाणी बरवें होय, अवघ्या वस्तू सवंग होतील, एकमेकांशीं प्रीती वाढेल, धन व कण याहीं करून लोक आनंद पावतील, स्वधर्म चालेल, सुभिक्ष होय. हीं बृहस्पतवारीं पाडवा पडल्याचीं फळें जाणावीं.

**शुक्रवारीं पाडवा पडे तरीं —** बरवें होय, मेघ वर्षाव चांगला होईल, पिकें बहुत होतील, सवंग सुकाळ होईल, घरोघरीं मांगल्य प्रवर्तेल, सर्व रस रेशीम रत्न माणीक सोनें मोतीं सर्व सवंग होईल. हीं शुक्रवारीं पाडवा पडल्याचीं फळें जाणावीं.

**शनवारीं पाडवा पडे तरीं —** राज्यावर परचक्रें चालतील, जहाजें बुडतील, रोग उद्भवतील, पाऊस थोडा पडेल, सर्व धान्य महाग होईल, नीळ उडीद पिकतील, काळीं लुगडीं कांबळीं वेगळीं करून बरकड महाग होतील, रस धातु महाग होईल, कारभारी लोकांस पीडा होईल, राजे झुंजतील, दोनी दळांचा भंग होईल, धरणीकंप होईल, उल्कापात होईल. हीं शनवारीं पाडवा पडल्याचीं फळें जाणावीं.

## बारा मासीं शुक्ल प्रतिपदेचें फळ.

**आदितवारीं पाडवा पडे —** ते मासीं धारण महाग होय. जोंधळे, गहूं, चणे, व चवळे हीं धान्यें महाग होतील. सोनें, रुपें, तांबें, कांसे, जो

खदें, गायी, म्हशी, व घोडीं सवंग होतील. उन्हाळा भारी होईल. रनें पीडतील. वारा बहुत वाजेल. पाणी घालीत असतां झाडें कोमेजून जातील. फळें थोडीं येतील. ज्वर, खोकला, खरूज इत्यादिक रोग बहुत उपजतील. सिंह राशीचे देश, गांव यां वांचून येरे देशीं हें फळ बोलावें, लोक भले असतील हीं आदितवाराच्या पाडव्याचीं फळें जाणावीं.

**सोमवारीं, बृहस्पतवारीं व शुक्रवारीं पाडवा पडे.—** ते मासीं सर्व देशीं पीक पाणी बरवें होय. राजा व प्रजा प्रतिष्ठा पावतील. एकमेकांशीं आनंदानें भेटी होतील. रोग शमतील. अवघ्या वस्तु सवंग मिळतील. चर्म महाग होईल असें जाणावें.

**मंगळवारीं पाडवा पडे.—** ते मासीं दुप्पट धारण चढे. नक्षत्र पात होय. गांवों गांवीं लोकांसीं वैरें पडतील. चोऱ्या होतील. दरवडे पडतील. खंडळ मंडळ पीक होईल. तेल, तूप, गूळ, सोनें, रुपें, तांबें, पोफळ, सुगंध, कस्तुरी, कांबळीं, रंगीत कापड, शेळ्या, व मेंढ्या त्या वस्तु सवंग होतील. विहिरी कोरड्या पडतील. वृक्षांचीं पानें फळें झडतील. वृश्चिका वांचून येरे राशींचे गांव सुखें नांदतील. वस्तू महाग होतील. हीं फळें नदीचे गांवीं जाणावीं. वृश्चिकराशी गांव खेडीं पीडा फार पावतील. तूळराशी अल्प पीडा पावतील. असें जाणावें.

**बुधवारीं पाडवा पडे तर.—** ते मासीं पंडितांसीं सुख समाधान होय. राजे आपले ठायीं बडिवार बोलतील. गर्भिणी स्त्रियांसीं हानी असे. सर्व धान्यें महाग होतील. येरे वस्तु सवंग होतील.

**शनिवारीं पडे तर.—** तील, उडीद व साळ्या वांचून येरा कणास धारण होय. वारा बहुत वाजेल. वाहाटोळी येतील. उंदीर, माकडें बहुत जन्मतील. तेला वांचून येरे रस महाग होतील. अनेक रोग उपजतील. सर्पोदरादिक उदरें, तिडका उठतील. बाळें, स्त्रिया यांस दुःखें अनेक होतील. मकर, कुंभा वांचून येरे देश गांव पीडा पावतील. क्लेश उपजतील. महर्गता होय. सौराष्ट्र देशीं झगडे लागतील. पक्षी जातीस रोग उपजतील. पुरुषांसीं काम थोडा होय. स्त्रियांसीं दुणा चढे. हींव पडे स्त्री विघडे हें शनिवाराचें फळ रोकडें.

## शुक्ल द्वितीयेचा चंद्राचें फळ.

अश्विनी, कृत्तिका, मृग, पुष्य, मघा, पूर्वाफल्गुनी, हस्त, चित्रा, अनु-

राधा, मूळ, पूर्वाभाद्रपदा, या अकरा नक्षत्रीं बिजेचा चंद्र तरी धान्य, कापड, सोने, रुपें, फळें, लवण, या वस्तूंची साधारण धारण असे. भरणी, आर्द्रा, आश्लेषा, स्वाती, शततारका, या पांच नक्षत्रीं चंद्र तरी सर्व वस्तु महाग होतील. पाऊस न वर्षे, पाणी ठायीं ठायीं थोडें होय. अवकाळीं हींव पडे. उन्हाळा फार. वारा बहुत वाजेल. आगी लागतील. कण महाग होईल. महा नद्यांस खांडवें पडतील. लहान नद्या कोरड्या पडतील.

रोहिणी, पुनर्वसु, उत्तराफल्गुनी, विशाखा, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा या नक्षत्रीं चंद्र ते मासीं बहुत सुकाळ होय, धान्यें निरोगी पिकतील. उन्हाळा स्वल्प होय. लोक आनंद पावतील. सर्व रस, धातु, वस्त्रें, व काष्ठें सवंग होतील. असें जाणावें.

मीन अथवा मेष या राशींवर शुक्ल द्वितीयेचा चंद्रोदय जाहला असतां चंद्राची उन्नता दक्षिणेस असते तेणें करून दुर्भिक्षता होईल मिथुनादि मकर पर्यंत राशींच्या ठायीं चंद्रोदय जाहला असतां उत्तरेस चंद्राची उन्नता असते तेणें करून सुभिक्ष, क्षेम आणि आरोग्यता अशीं फळें होतात. आणि वृषभ, कुंभ यांजवर चंद्रोदय जाहला असतां चंद्राचें समत्व असतें तेणें करून राजाची कलह विदूरता होते.

## अमावास्येचें फळ.

**अमावास्या आणि संक्रांती एका वारीं पडे.—** तर ते मासीं धारण महाग होय. मंगळवारीं अमावास्या पडे तर राजांसीं वैरें पडती, लोहपात होय. दरवडे पडतील. लोक बहुत पीडतील. शनिवारीं पडे तरीं लोकांसीं रगत रोडा होय. वारा बहुत वाजेल. सर्व धान्यें, सर्व रस, महाग होतील. आगी लागतील. जनासीं बहुत पीडा होईल. बाकीच्या वारीं पडे तरीं राजा प्रजा सुखी. असें जाणावें.

## रोहिणीनक्षत्राचें फळ.

**आषाढशुद्ध दशमीस रोहिणी येती तरी—** सुकाळ होय. लोकांस आनंद होईल. मंगळतुरें वाजतील. आषाढशुद्ध एकादशीस पडे ते वर्षी मरक वाहे, रोग वाढती. शुद्ध ११ एकादशीस पडे तर दुष्काळ होय. कण महाग होतील. आषाढशुद्ध नवमी शनवारीं रोहिणी पडे तर दुष्काळ होय

नक्षत्रभंग होतील. थोर थोरांसी मृत्यु होय. आषाढ शुद्ध नवमी शुक्र-वारीं पडेतर सुकाळ होय. धान्यें पिकतील. घरोघर आनंद होय.

## संक्रांतीचें फळ.

**कर्क संक्रांत आदितवारीं पडे तरी:—** दुणी धारण चढे. सोम, बुध, शुक्र गुरु वारीं पडेतरीं धारण सवंगता महागता होईल. मध्यम असे. मंगळवारीं पडे तरीं दुणी धारण चढे. शनिवारीं पडेतर चौगुणी धारण होय.

## चंद्रसूर्याच्या खळ्याचा गुण.

भाद्रपद कृष्ण ७ मीस सूर्य खळें करील तर हींव पडे. मार्गशीर्ष कृष्ण ८ व पौषशुद्ध १५ स खळें करीतर हींव बहुत पडेल. पाखरें मरतील. कापास वृद्धी होईल. पौषशुद्ध ९ आदितवारीं सूर्य खळें करी तरीं तांबेरा पडेल.

सूर्याला किंवा चंद्राला खळें प्रथम प्रहरीं पडलें तर जनास पीडा होईल. दुसरे प्रहरीं पडलें तर पर्जन्य पडेल. तिसरे प्रहरीं धान्याचा नाश होईल. आणि चतुर्थ प्रहरीं पडलें तर राज्यभंग होईल.

## शुक्राचें फळ.

**शुक्र पूर्वदिशेस तरी:—** पाणी खंडळ मंडळ होय. शुक्लपक्षीं शुक्रवारीं शुक्र उदय किंवा अस्त करी तर गावीं गावीं नक्षत्र भंग होईल. जनासीं अनेक पीडा होतील. अथवा पर्जन्य वृष्टी अतिशय होईल. कृष्णपक्षीं शुक्रवारीं अस्त किंवा उदय तर सुकाळ होय, भरणी, कृत्तिका, रोहिणी व मृग या नक्षत्रीं अस्त किंवा उदय होय तर चतुष्पादांसी नाश होय. आर्द्रा, पुनर्वसु, व आश्लेषा या नक्षत्रीं होयतर पाऊस बरवा पडे सुकाळ होय. मघा, पूर्वा, हस्त, चित्रा या नक्षत्रीं होयतर पीक खंडळ मंडळ होय. ज्येष्ठा, मूळ, पूर्वाषाढा व श्रवण या नक्षत्रीं होयतर महर्गता. धनिष्ठा, शततारका, पूर्वाभाद्रपदा, उत्तराभाद्रपदा, रेवती, अश्विनी व कृत्तिका या नक्षत्रीं सुकाळ होय.

## शुक्राचा अस्तोदय.

## मास फळ.

चैत्र वैशाख चतुष्पाद नाश. ज्येष्ठीं मही हाले. आषाढीं गहिजल-शोष. श्रावणीं लोकनाशकरी. भाद्रपद राजपद बंध. आश्विनी धान्यपीक हो-

य. कार्तिक मार्गशीर्ष महिडोळे. पौष राजे भिडती. माघीं महिडुळे. फाल्गुनीं धारण महाग होय.

## शुक्र कोणे द्वारें गेला तें पहाणें.

अश्विनी पासून ९ नक्षत्र पर्यंत मेष द्वारा. मघा पासून पांच नक्षत्रें वायु द्वारा. स्वाती पासून आठ नक्षत्रें धन द्वारा. धनिष्ठा पासून पांच नक्षत्रें धुलि द्वारा गेला असें जाणावें.

## मंगळाचे उदयाचें फळ.

**मेषवृषभीं उदय करीतर**— उडीद, तीळ नपिके. येरा धान्या खंडळ मंडळ पीक होय. मिथुन, कर्की होयतर— अतिवृष्टि हेय. अग्रधान्यें जातील; जोंधळे, गहूं, चणे पिकतील. सिंहीं उदय करीतर— सोनें, रुपें, पितळ, तेल महाग होईल. कन्याराशीं उदय करीतर— दुष्काळ पडेल. तूळराशीं उदय होईतर— तृण, काष्ठ, फळें महाग होतील, कणाशीं धारण होय. वृश्चिक राशीं उदय करीतर— चोरभय, अग्निभय, सर्प, विंचू बहुत होतील. पीक पाणी बहुत होय. धनराशीं उदय करीतर— साळी ऊंस थोडे पिकतील; श्रावण भाद्वा — कोरडे जातील. मकरीं उदयो तरी— पहिलें पाणी पडेल. अग्र धान्यें जातील. पश्चात् धान्यें बहुत पिकतील. कुंभीं उदय तरीं— पर्जन्य अतिवृष्टि होय. तेणें ओला दुष्काळ होय, पिकें जातील. मीनी, अश्विनी उदय तरी— राजभय होय. कणधातू चतुष्पाद आदिकरून अवघ्या वस्तू महाग होतील. परचक्रासीं युद्ध सांगे.

## बृहस्पतीचा उदय.

ज्येष्ठमासीं उदय तरीं— अल्प पर्जन्य पडेल. खंडळ मंडळ पीक होय. आषाढीं उदय तरीं— रायासीं संग्राम होय. देशोदेशीं पळणी होय, दुष्काळ पडेल. श्रावण मासीं उदय तरीं घरोघरीं सुकाळ होय, आनंद होय. भाद्रपदीं उदय तरीं— पश्चाद्धान्यें सुकतील, अल्प पीक होईल. आश्विन मासीं उदय तरीं— कणमहाग होईल, वायू वादेल. पौष माघ मासीं उदय तरीं— पर्जन्य खंडळ मंडळ पडेल. धान्य महर्गता परंतु प्रजा सुखी.

## मळमासाचीं फळें.

बत्तीस मास, सोळा दिवस आणि चार घटिका इतके भोगल्यावर अधिकमासाचा (मलमासाचा) संभव होतो.

# सहदेव मताचें.

चैत्र दोन जरी होती— धान्य पिके क्षिती, वैशाखीं आनंदती सकळ लोक. धान्य पिके क्षिती आसमास. ज्येष्ठ दोन जरी होती तें— अपार राजे मरती. आषाढ दोन होती तरी— पाऊस न पडे क्षिती, जळें करूनी शोषती भूमंडळें. श्रावण दोन जरी होती तरी— दुर्भिक्ष पडे क्षिती अपार नासती जन पृथ्वीचे. भाद्रपद दोन होती तरी— धान्य पिके क्षिती. चिंतिलें फळ पावती सर्वजन. आश्विन दोन जरी होतीतरी— चोरापासूनी भयें होती. राजीक राष्ट्रीं होय. अनि सार्वभौम रायासी.

## शीघ्र प्रसूतीयंत्र.

प्रसूत न होतां दाखविजे विधिंगज. अग्नी ३, वेद ४, रस ६, बाण १ वसू ८, रस ९, मुनि ७, पक्ष २ नव कोष्टकां मध्यें प्रसूत काळीं भूमी विलोक्य करवेंच नारी प्रसवती शीघ्रं.

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | १२ | १ | १४ |
| ११ | ८ | १३ | २ |
| १६ | ३ | १० | ५ |
| ४ | १५ | १६ | ९ |


| | | |
|---|---|---|
| ८ | १ | ६ |
| ३ | ५ | ७ |
| ४ | ९ | २ |


मेषलग्नीं तांबडी वस्त्र असे ॥१॥ वृषभ लग्नीं पांढरी अथवा पिंवळी असे. ॥२॥ मिथुन लग्नीं पिंवळीच असे. ३ कर्क लग्नीं श्वेत असे. ४ सिंह लग्नीं आरक्त. ५ कन्या लग्नीं पिंवळी. ६ तूळ लग्नीं श्वेत. ७ वृश्चिक लग्नीं तांबडी. ८ धन लग्नीं पिंवळी अथवा श्वेत. ९ मकर लग्नीं काळी कृष्ण. १० कुंभलग्नीं कृष्ण. ११ मीन लग्नीं श्वेत वस्त्र. १२ चंद्र. १ नेत्र. २ राम. ३ वेद. ४ पांडव. ५ षष्ठ. ६ मुनी. ७ वसू. ८ नंदा. ९ अवतार. १० रुद्र. ११ द्वादशा दित्य. १२ आषाढेच शनी पंच, श्रावणी रविपंचके, भौमे भाद्रपदे पंच कर्तव्यो धान्य संग्रह. आषाढे श्रावणे मासे माघेर्के पंचमं भवेत् नदार्थो जायते घोरः पिता विक्रय तेकना.

## हळचक्र.

राम राम गुणा पंच, राम राम गुणाः स्मृताः ॥ अकारादि सूर्य नक्षत्र-शुभाशुभ शुभ सेवच सूर्य नक्षत्रा पासून दिवस नक्षत्रें मोजावीं, पहिलें नक्ष-


त्र रुमण्या पासून नेसवावें रुमण शुभाशुभं.



१ माथा शद-
कोठें काजळ
कोण्ही
१२ अनावृष्टिपी-
क होय.
४ पुच्छनीस्तहुलिन.
५ चाहे भय सांग.

सूर्यभात गणेश्चंद्र असधीर भागमा हरेत त्रिष्टभरण चेहुदु सप्तम हता- आडळ एक पंच चत्वारी आडळ नाशती चक्रा चक्राचे मुहूर्त.




सूर्य नक्षत्रा पासून दिवस नक्षत्रा पर्यंत मोजावें. १ नेसवावें पहिलें कोट यरि- से धनलाभ सांगे दुसरें २ मधिंदुःखहानी सांगे. चवथा माया नवऱ्यास यो- ग्यता. पांचवा ५ कातरी मध्यें मृत्युयोग ७ सप्तमे रोगहानी ३ बैठा बैसला द्रुय लाभ सांगे २ अष्टमा उजवा शेला. ८ सर्व लाभ सांगे.

## नारीस ऋतु आला तो पहाणें.

चैत्रमासीं प्रथम ऋतु- नारी विधवा, वैशाखे- धनसंपदा, ज्येष्ठे- रो- गीमृत्यभवेत्, आषाढे- मृतप्रजा, श्रावणे- धनिका भवेत्, भाद्रपदे- सु- चे नारी, आश्विनी- ते जारिणी, कार्तिकीं- निर्धन नारी, मार्गशीर्षे- ब- हुप्रजा, पौषे- पुत्रवती नारी, माघे- पुत्रसुखानित्य, फल्गुनी- सुख संपदा ही मास लक्षणें जाणावीं.

## वारलक्षणें.

आदितवारीं- विधवा नारी, सोमवारीं- पतिव्रता, मंगळवारीं- हानी, बुधवारीं- कन्या प्रसूति, गुरुवारीं- पुत्रवती, शुक्रवारीं- बहुप्रजा, शनि-

वारीं वंध्या. हीं वारांचीं लक्षणें जाणावीं.

## तिथिलक्षणें.

प्रतिपदा- स्वरूपाकिणी, द्वितीया- भाग्य वर्धिनी, तृतीया- धष्टपुष्टांगी, चतुर्थी- दुष्टीभवेत्, पंचमी- पुंश्चलानारी, षष्ठी- व्याधिष्टा भवेत्, सप्तमी- कुश्चलानारी, अष्टमी- तमोशनि, नवमी- कामवर्धिन, दशमी- बहुप्रजा, एकादशी- पुनःशची, द्वादशी- बहुप्रजा, त्रयोदशी- कामी, चतुर्दशी, पौर्णिमा व अमावास्या- उभया वल्लि भवेत्. गृहामध्यें- सुखमाप्ति, घराद्वारा- वियोगिनी, शिवे संप्राप्नोति धनामध्यें बहुजा.

## नक्षत्रफल.

अश्विनी नक्षत्रावर प्रथम ऋतु प्राप्त जाहला असतां- शुभ, भरणीवर- विधवा, कृत्तिकांवर- वंध्या, रोहिणीवर- प्रियभाषिणी, मृगावर- दरिद्री, आर्द्रावर- क्रोधी, पुनर्वसूंवर- पुत्रप्राप्ति, पुष्यावर- पुत्रधनवती, आश्लेषांवर- वांझ, मघांवर- अर्थप्राप्ति, पूर्वावर- अर्थप्राप्ति, उत्तरांवर- सती, हस्तावर- पुत्रधनप्राप्ति, चित्रांवर- पतिमतानुरूप चालणारी, स्वातींवर- अन्यगर्भी, विशाखांवर- निष्टुर, अनुराधांवर- दुर्भगा, ज्येष्ठांवर- विधवा, मूळावर- पतिव्रता, पूर्वाषाढांवर- सौभाग्य, उत्तराषाढांवर- लक्ष्मीदायक, श्रवणावर- सौभाग्यसंपत्ति, धनिष्ठांवर- शुभ, शततारकांवर- कल्याणयुक्ता, पूर्वाभाद्रपदावर- उत्तम भोग, उत्तराभाद्रपदावर- लक्ष्मीप्राप्ति, आणि रेवतीवर- पती वांचून राहील. असें जाणावें.

## राशिफल.

मेषराशीवर ऋतु प्राप्त झाला असतां- जारिणी, वृषभराशीवर- सुखभोगिनी, मिथुनराशीवर- धनयुक्ता, कर्कराशीवर- दुःखी, सिंहराशीवर- पुत्रवती, कन्याराशीवर- अभिमानी, तूळराशीवर- विचक्षणा, वृश्चिक राशीवर- जारिणी, धनराशीवर- पतिव्रता, मकरावर- कृशा, कुंभावर धनवती, मीनावर- चपला. असें जाणावें.

## गर्भाधानास मुहूर्त.

प्रथम ऋतु प्राप्त झाल्यावर पुन्नक्षत्रीं शुभदिवशीं मघा, मूळ, रेवती व अमावास्या आणि पूर्णिमा वर्ज करून उक्त चंद्रबळ पाहून मुहूर्त द्यावा.

## ऋतूच्या षोडशरात्रींचें शुभाशुभ फल.

ऋतु प्राप्त झाल्यापासून स्वभावें करून स्त्रीचे ठायीं सोळा रात्री अ-

असतो त्या मध्यें प्रथम ३ रात्री पुष्पवती चांडाळी सम होय. आणि चोथी अकरावी तेरावी त्या निंदित वर्ज करून शेष १० रात्रि प्रशस्त होय.

चोथे रात्रीस स्त्रीसंग केला असतां अल्पायुषी आणि धनवर्जित, असा पुत्र होतो. पंचम रात्रीस कन्या, षष्ठ रात्रीस मध्यम पुत्र, सप्तम रात्रीस अपत्य होणार नाहीं. अष्टम रात्रीस ईश्वरभक्त पुत्र होईल, नवम रात्रीस सौभाग्य वृद्धि, दशम रात्रीस गुणवान् पुत्र, अकरावे रात्रीस अधार्मिक पुत्र, बारावे रात्रीस उत्तम पुरुष, तेरावे रात्रीस पाप कर्मी वर्ण संकर करणारी कन्या, १४ चवदावे रात्रीस धर्मकृतज्ञता जाणणारा आणि आत्मवेत्ता व दृढव्रत करणारा असा पुत्र होईल. पंधरावे रात्रीस पतिव्रता, सोळावे रात्रीस सर्व भूतांस आश्रय देणारा असा पुत्र होईल.

## जन्मकाळाचीं शुभाशुभ फळें.

### तिथिफळ.

पाडवा- साधू, बीज- बहिरा, तीज-अहंकारी, चतुर्थी-परद्वारीं, पंचमी-उपकारी, षष्ठी- चालक, सप्तमी- जोशी, अष्टमी-दरिद्री, नवमी भोळा, दशमी-भाविक, एकादशी- विरुद्ध धर्मी, द्वादशी-परोपकारी, त्रयोदशी-मंत्री, चतुर्दशी- झुंझार, पोर्णिमा अमावास्या जन्मे तो बंदी पडे.

### कृष्णाचतुर्दशीचें फळ.

कृष्णा चतुर्दशीस जन्म झाल्यास तिथीचे ६ भाग करावे. त्यांचीं फळें:- प्रथम भाग १० घटिकांचा शुभ, द्वितीय भाग पित्यास वाईट, तृतीय भाग मातेस वाईट, चतुर्थ भाग मातुळास वाईट, पांचवा भाग वंशास वाईट, सहावा भाग धन आणि आत्मवंश नाशक असें जाणावें.

### अमावास्येचें फळ.

चतुर्दशी युक्त अमावास्येस:- दासी, भार्या, गाय, हत्तीण, घोडी आणि म्हैस यांची प्रसूति झाली असतां स्वामीची (धन्याची) संपत्ति जाईल. आणि अमावास्येस प्रसूत झाली असतां पुष्कळ दोष. आणि स्वामीच्या आयुष्याचा नाश व धनाचा नाश व त्रिविध गंडांता सम प्रबल दोष कारिणी ही प्रसूति होय असें जाणावें.

### नक्षत्रफळ.

अश्विनी, मघा, मूळ, या नक्षत्रांच्या पूर्वार्धीं जन्म झालें तर बापास वाईट; रेवती, ज्येष्ठा त्या दोन नक्षत्रांच्या उत्तरार्धीं जन्म झाल्यास मातेस वाईट; आणि गंडांतीं जन्म झाल्यास मुलाचा त्याग करावा. अथवा सहा महिने पर्यंत त्याचें मुख पाहूं नये.

अश्विनीवर जन्मे– नरी योगी होय. भरणी– गृहस्थराव. कृत्तिका– अल्पायुषी, जुगारी. रोहिणी– सत्यवेव्हारी. मृग– भाग्य सफळ. आर्द्रा– छत्र-निरोपण. पुनर्वसू– तस्कर. पुष्य– विद्वान ज्ञानी. आश्लेषा– निर्फळ वांझ. मघा– योगिराज. पूर्वा– धार्मिष्ट. उत्तरा– घातकर्मिष्ट. हस्त– क्षत्री. चित्रा– ओदाळ मैत्री. स्वाती– अल्पदरिद्री. विशाखा– ओदाळ मैत्री, कष्टी दरिद्री. अनुराधा– आचारशील. ज्येष्ठा– अधम. मूळ– बुडती दोन्ही कुळें. पूर्वाषाढा– धन विद्या अपार. उत्तराषाढा– महाचतुर. श्रवणी– हीन कर्मी. धनिष्ठा– धन लोभी, महाकर्मी. शततारका– योद्धा. पूर्वाभाद्रपदा– वैरी कुषी. उत्तराभाद्रपदा– महाबळी. रेवती– दयावंत जगजेठी. उपजल्या नक्षत्राचे गूण. भाडळी बोले सहदेवा ह्रदयींचो खूण ह्रदयीं ठेवा. चउथ, बारस, रवि, गुरु, मंगळ वार बरवा. चवथ्या ज्येष्ठा मूळ आश्लेषा एते मैजो नर होय सहदेव कहे भाडळी ये पुत्र पराया.

## जन्मकाळीं मूळनक्षत्र कोणते लोकीं आहे तें पहाणें.

वृषभ, वृश्चिक, सिंह, कुंभ या चोहोंतून कोणत्याही लग्नीं जन्म झालें असतां त्यादिवशीं मूळ नक्षत्र स्वर्गी आहे त्याचें फळ राज्य प्राप्ति. मिथुन, तूळ, कन्या, मीन या लग्नीं जन्म जाहलें असतां मूळ नक्षत्र पाताळीं आहे. त्याचें फळ धन प्राप्ति. मेष, धन, कर्क, मकर, या लग्नीं जन्म झालें तर मृत्युलोकीं आहे त्याचें फळ सर्व कुटुंबास वाईट. असें बारा लग्नांचें फळ वेगळें वेगळें जाणावें.

## मूळ नक्षत्रावरील जन्म फळ.




सेंडालाभ ४ यशवंत होय ८
मूळ पात १२ पर धन पावे ७
मध्यें हानि ५ सफळ राज्य करी १०
बंधुनाश ३
मामारा चोरवे ११

## लेंकरूं जन्मलें तें पहाणें.

चतुर्दशीस अर्धरात्री रेवती स्वाती यानक्षत्रीं यातिथीस जन्म होय तरी माता पित्यास ताप संचरे आसपास उजाड होय. नावधरे तो ब्राह्मण-पीडा पावे.

## बारा मासांचीं जन्म फलें.

चैत्रांत जन्मला तरी – भला जाणावा. वैशाखीं – दातार होय. ज्येष्ठीं – तो फारगांवें पाहे. आषाढांत – रोगी होय. श्रावणांत – लक्ष्मीवंत होय. भाद्रपदांत – संतोषी होय. आश्विनांत – अभिमानी होय. कार्तिकांत – रूपवंत होय. मार्गशीर्षांत – क्रोधी होय. पौषांत – रूपवंत होय. माघांत – गुणवंत होय. फाल्गुनांत – भूमी भार होय.

## तिथींचीं जन्मफलें.

पाडव्यास जन्मला नर – बहुत रागीट. बीजेला ज० – स्त्री जित होय. तिजेला ज० – स्त्रीवश्य होय. चतुर्थी ज० – नावर होय. (गरीब) पंचमीस ज० – मूर्ख होय. षष्ठीस ज० – पीडा दुःख होय. सप्तमीस ० – अवतारीक होय. अष्टमीस ज० – पारखी होय. नवमीस ज० जोगी होय. दशमीस ज० – गोकुळ गवळी होय. एकादशीस ज० – अति मूर्ख होय. द्वादशीस ज० – देशमुख पाटील होय. त्रयोदशीस ज० – लक्ष्मी वंत होय. चतुर्दशीस ज० – क्षत्रिय होय. पूर्णिमेसी ज० – रूपवंत ईश्वर होय. अमावास्येसी ज० – रोगी होय.

## सात वारांचें जन्मफळ.

रविवारीं जन्मे तो भक्त होय. सोमवारीं जन्मे तो चतुर होय. मंगळवारीं जन्मे तो रागीट होय. बुधवारीं जन्मे तो विद्यावंत होय. बृहस्पत वारीं जन्मे तो भलाचतुर होय. शुक्रवारीं जन्मे तो दातार होय. शनवारीं ज० – दरिद्री होय.

## सत्तावीस नक्षत्रांचें जन्मफळ आयुष्य व अपमृत्य.

**अश्विनीनक्षत्रीं जन्मलातरी** – क्रोधी होय, घात दिवस ८ घातमास ४ घातवर्षे ७॥ घात वर्षे १५॥ घात वर्षे २१॥ घात वर्षे ३३॥ घात वर्षे ४०॥ तथापि जगला तरी वर्षे ८० ॥ १॥

**भरणीस जन्मला तरी** – घातदिन ९ घात मास १ घात वर्षे १ घात वर्षे ११ घात वर्षे ३०॥ घात वर्षे ७२॥ एकूण आयुष्य १०० ॥ २॥

**कृत्तिकांत जन्मला तरी** – घात दिवस १ घातमास ९ घात वर्षे ११॥ घात वर्षे २५ घात वर्षे ५२ घात वर्षे ५६ घात वर्षे ६९ त्यावरी वर्षे ७० एकोण-

हातीं मरण होय. ॥ ३॥

**रोहिणीवरी जन्मला तरी**:— घात दिवस ८ घातमास ११ घात वर्षे २१ घातवर्षे ६७ घातवर्षे ८० घातवर्षे ८५ मृत्यु सर्पाहातीं होय. ॥ ४॥

**मृगांत जन्मला तरी**:— घात दिवस ११ घातवर्षे २१ घातवर्षे ६० आयुर्बल ८० सर्प मुखें मरण होय. ॥ ५॥

**आर्द्रेत जन्मला तरी**:— घात दिवस ७ घातमास ३ घात वर्षे ४ घातवर्षे १७ घात वर्षे २७ घात वर्षे ३० घातवर्षे ६० याचा आयुर्दाय ८० सर्पा हातीं मृत्यु होय. ॥ ६॥

**पुनर्वसूंत जन्मला तरीं**:— घात दिवस ९ घातमास ५ घातवर्षे १७ घातवर्षे ३० घातवर्षे ५५ आयुर्बळी ९५ दुरवणीयानें मरेल. ॥७॥

**पुष्यांत जन्मला तरी**:— घात दिन ८ घातमास १२ घात वर्षे १३ घातवर्षे १७ घातवर्षे २७ घातवर्षे ५३ आयुर्बल वर्षे ६० मृत्यु सुखें होईल. ॥८॥

**आश्लेषांत जन्मला तरी**:— घात दिवस ११ घातमास १३ घातवर्षे २२ घातवर्षे ३५ घातवर्षे ४८ घात वर्षे ५३ घातवर्षे ६५ घातवर्षे ७९ घातवर्षे ८५ आयुर्दाव वर्षे ९९ मृत्यु पाण्यांत पडून मरेल. ॥९॥

**मघांवर जन्मला तर**:— दिवस ९. मास ५॥ वर्ष १॥ अथवा ९ दीन ८ घातयोगें मृत्यु. वर्षे ४ मास ४ दीन ५ चोराचे संगें मृत्यु. वर्षे ६ अथवा १० मास ११ दिन १८ राहो अरिष्टें मृत्यु. वर्षे २० मास ७ दिवस ४ राजयोगें मृत्यु. वर्षे २५ अथवा २६ मास ८ दिन ११ जाळयोगें मृत्यु. वर्षे ३० मास ९ दिन १५ कांहीं घातें मृत्यु. वर्षे ३६ तथा ४१ अथवा ४२ मास ४ दिन ९ घात योगें मृत्यु. वर्षे ६० मास ४ दिन ७ कांहीं जळ योगें मृत्यु. अंतीं निजमरण. तदा जीवती. वर्षे ८५ अथवा ८७ अ० १०० मास ८ दिवस ७ वैशाख शुद्ध ९ अ० १० रविवारीं पूर्वा नक्षत्र प्रथम प्रहर अथवा वैशाख वद्य ९ बुधवारीं आश्लेषा नक्षत्र ज्वर योगें मृत्यु. ॥१०॥

**पूर्वा वर जन्मला तरी**:— सिंह, रविस्वामी, मनुष्यगुण, क्षत्रियवर्ण, चरणे च्यार, प्रथम चरण पंचपुत्रानि, द्वितीय चरण विद्यावंत, तृतीय चरण सौभाग्य वंत, चतुर्थ चरण अन्नधन सामर्थ्य, घृत प्रिय, वैराग्य मनी देवब्राह्मण भक्त, मातापिता भक्तिवंत, बहु कुशल, परिमळ प्रिय, पश्चात्तापबुद्धि, स्त्रीवचन कर्ता, महाविनोदी, कौतुकी, बाळप्रिये, क्षेरीमारी धनवंत, सेवा कर्ता, भार्या २ प्रथम भार्या विनश्यति, प्रथमपुत्रं नष्टं, दक्षिणांग कस्थानं,

आयुष्य प्रमाण, गंडांतर, वर्ष १ मास ११ दिन ७ शत्रुहस्तें मरण, वर्षे ४ अ० ६ मास ५ दिवस ७ जाळ तापें मृत्यु. वर्षे १० अ० ११ मास ७ दिवस-१३ निकाळ योगें मृत्यु. वर्षे १६ मास २ दिन १४ राहो अरिष्टें मृत्यु. वर्षे १९ तथा २० मास २ दिवस २५ दुष्टकर्मे मृत्यु. वर्षे २५ अथवा ३१ मास ४ दिवस ५ श्वासयोगें मृत्यु. वर्षे ४१ अ० ४२ अ० ५५ मास ७ दिवस १२ बाहेर संकोचें मृत्यु. निजमरणं. लदाजीवंति. वर्ष ८४ अथवा ८७ अथवा १०० चैत्र शुद्ध ८ अथवा ९ अथवा १० पूर्वानक्षत्रीं रविवारीं पहिल्या प्रहरीं परमात्मा देहे त्यजते. तथा माघ शुद्ध १० शनिवारीं कृत्तिकानक्षत्र दिवसा घटिका १० ग्रहा अरणे मृत्यु. ॥ ११ ॥

**उत्तरावर जन्मला तर**:– घात दिवस ४ घातमास ३ घातवर्षे १६ घातवर्षे २२ घातवर्षे ३१ घातवर्षे ४९ घातवर्षे ५७ घातव० ६२ घातव० ७५ यांत याचें आयुष्य ९० आपस्करें मृत्यु होय. ॥ १२ ॥

**हस्तनक्षत्रीं जन्मला तर**:– घातदिन २ घातमास ३ घातवर्ष १३ घातवर्ष १४ घातवर्ष २८ घातवर्षे ३८ घातवर्ष ५७ घातवर्ष ७९ घातवर्ष ८३ आयुर्दाय ९९ बंधूचे हातीं मरण पावेल. ॥ १३ ॥

**चित्रा नक्षत्रीं जन्मतरी**:– घातदिन १ घातमास ६ घातवर्ष १ घातवर्ष १५ घातवर्ष २५ घातवर्ष ३० घातवर्ष ४० घातवर्ष ४५ घातवर्ष ५१- घातवर्ष ६३ आयुर्बल ९० परक्या हातीं अपघातानें मरण पावेल. ॥ १४ ॥

**स्वाती नक्षत्रीं जन्मे तरी**:– घात दिवस ४ घातमास ५ घातवर्ष २ घातवर्ष १३ घातवर्ष २७ घातवर्ष ४१ घातवर्ष ४५ घातवर्ष ७८ घातवर्ष ७९ स्फुरखें मृत्यु होय. ॥ १५ ॥

**विशाखांत जन्मला तरी**:– घातदिन ५ घातमास ६ घातव० ९ घातवर्ष १७ घातवर्ष २३ घातवर्ष २६ घातवर्ष ३६ घातवर्ष ५० घातवर्ष ६२ घातवर्ष ८२ घातवर्ष ८३ घातवर्ष ८४ आयुर्दाय २० आपस्करें मृत्यु. ॥ १६ ॥

**अनुराधांत जन्मे तरी**:– घातदिवस १२ घातमास ४ घातवर्षे १९ घातवर्षे ३२ घातवर्षे ४२ घातवर्ष ५२ घातवर्ष ६० आयुर्बळ वर्षे ८६ घोड्याहातीं मरण पावेल. ॥ १७ ॥

**ज्येष्ठा नक्षत्रावर जन्मे तरी**:– घातदिवस ११ घातमास १७ घातवर्षे २५ घातवर्ष ३३ घातवर्ष ४८ घातवर्ष ६५ याचें आयुर्बळ ७० सिद्धि मरण होय.

**मूळावरी जन्मे तरी**:– घात दिवस ४ घातमास ११ घातमास १७ घात

र्ष २५ घात वर्ष ३३ घातवर्ष ४८ घातवर्ष ६५ घातवर्ष ८० आयुर्बळ ९९ आपस्करवें मृत्यु होय. ॥१९॥

**पूर्वाषाढावरी जन्मे तरी:**— घात दिवस ५ घातमास १ घात वर्ष ११ घातवर्ष २० घातवर्ष २१ घातवर्ष ३२ घातवर्ष ३८ घातवर्ष ४४ घात वर्ष ५६ घातवर्ष ६२ याचें आयुर्दाय ९९ मृत्यु घोडी पासून होय. ॥२०॥

**उत्तराषाढावरी जन्मे तरी:**— घातदिवस ५ घातदिवस ९ घातमास ३,४ घात वर्षे १६ घातवर्ष ३४ घातवर्ष ४५ घातवर्ष ५८ घातवर्ष ८६ आयुर्बळ ९० मृत्यु उदका पासून होईल. ॥२१॥

**श्रवण नक्षत्रीं जन्मे तरी:**— घात दिवस ११ घातमास २ घातवर्ष २१ घात वर्ष २२ घातवर्ष २५ घातवर्ष ४९ घातवर्ष ५० घातवर्ष ६० आयुर्बळ वर्षें ८४ तापानें मरण होय. ॥२२॥

**धनिष्ठांत जन्मे तरी:**— घातदिन १२ घातवर्षे ९ घातवर्ष १७ घातवर्ष २९ घातवर्ष ४० घातवर्ष ५० घातवर्ष ६० आयुर्बल वर्षें ७७ लोहोशस्त्रें करून मरण येईल. ॥२३॥

**शततारका नक्षत्रीं जन्मे तरी:**— घातदिवस ४ घातमास ८ घातवर्षें १४ घात वर्षे ३३ घातवर्ष ४० घातवर्ष ५० घात वर्ष ७५ घातवर्ष ७९ आयुर्दा ८० आपस्करवें मृत्यु येईल. ॥२४॥

**पूर्वाभाद्रपदावर जन्मे तरी:**— घातदिन ४ घात मास ३ घातवर्ष १ घात वर्ष १४ घातवर्ष २५ घातवर्ष ३५ घात वर्ष ४९ आयुर्दा ६० कफोदरानें मृत्यु होय. ॥२५॥

**उत्तरा भाद्रपदा वरी जन्मे तरी:**— घात दिन ६ घात मास ६ घातवर्षें ४ घात वर्षे ९ घातवर्ष १६ घातवर्ष २६ घात वर्ष ३६ घातवर्ष ५१ घातवर्ष ७८ याचीं आयुर्दाव वर्षें ८८ स्करवें मृत्यु होईल. ॥२६॥

**रेवती नक्षत्रीं जन्मला नर:**— घातदिवस ४ घातमास ३ घातवर्ष ११ घातवर्ष २३ घातवर्ष २८ घातवर्ष ४० घातवर्ष ५५ आयुर्बळ ८६ स्करवें मृत्यु होईल. ॥२७॥

## अश्विनी नक्षत्रीं जन्मफळ.

अश्विनी मध्यें जन्मे तो नवचरण फळ पावे:— प्रथम चरणीं राजा, द्वितीय चरणीं धनाढ्य, तृतीय चरणीं विद्यावंत, चतुर्थ चरणीं तस्कर, पंचम चरणीं गुरुमार्ग होय, षष्ठ चरणीं कसपट, सप्तम चरणीं योगींद्र, अष्टम-

चरणीं निर्धन, नवमचरणीं सर्व लक्षणी युक्त होय. श्रीमहादेव वाक्य असे. प्रथम घातमास, घातवर्ष व र्ज तथा सासूश्वशुरादि पीडा दीन ५ तथा वर्ष ४ देव दुःखीदीन ३ सन्मुख चंद्र अर्थलाभ, दक्षिणे सुखसंपदा, पृष्ठी तो मरणं चैव वामेंद्र उच्चन, चंद्रफळ पहावें.

## राशीफळ.

**मेषराशीचें फळ.—** दिन सोमवार राजा पूज्य, विचक्षण स्वामी वस्तुभायस्याः वर्ते धर्मशीनी सौभाग्य वंदी दशार्क, तथा मैथुन प्रियः अथ मृत्यु संभव वृद्धाः एक वर्ष कष्ट, अष्ट वर्षे कष्ट, एकेचाळीस वर्ष कष्ट, वर्ष ५० कष्ट, अल्प मृत्यु, यदाशुभग्रह रक्षतु, तदा रक्षंती पंचाहान्तर कार्तिक मासे कृष्णपक्षे, मनुष्यगण, भरणी नक्षत्र द्वितीया मंगळवार शुक्लपक्षे देह मध्यान्हे त्यजती. इति मेषराशी फलं. ॥ १॥

**वृषभराशीचें फळ.—** वृषभासी द्विकन शुक्रवार, राजापूजी गोवर्धन मिष्टान्न भोजन, परद्वार दर्शन व एकादशी कष्ट, एकभाव वर्षे ५० वर्षे ५४ कष्ट, अल्पमृत्यु, वेदासुग्रह रक्षतु तदा वर्षे ८५ मार्गेश्वर मास कृष्णपक्ष अमावास्या तिथी तथा भौम्यादीन, मनुष्यगण, रोहिणी नक्षत्र अतिदीन सारदेह त्यजीती. इति वृषभ राशी फलं. ॥ २॥

**मिथुनराशीचें फळ.—** तथा बुधवार दिवसेस कोमळ सुखी मैथुन प्रियः सौभाग्यवती, तथा नामावती अधिकाराः अथ गंधमाल्यप्रियः वर्षे अष्टादश तथा वर्षे २५ तथा वर्षे ४३ अल्पमृत्यु यदासुग्रह रक्षतुः तदा वर्षे ७५ जीवंती पौषमास कृष्णपक्ष अष्टमी बुधवार दिन तथा मनुष्यगण आर्द्रानक्षत्र राक्षसगण प्रथम प्रहर उर्ध्वश्वासें देह त्यजती. इतिमि० ॥ ३॥

**कर्कराशीचें फळ.—** विवंचना सुशील मान सक्रोधा अल्पमृत्यु वर्षे ४६ अथवा वर्षे ६० वेदा सुग्रह रक्षतु तदा वर्षे १०० जीवंती माघ मास शुक्लपक्षे पौर्णिमा सोमवारे पुष्य नक्षत्र देवगण रीशी प्रथम प्रहरे देह त्यजती. इति कर्क राशीफलं. ॥ ४॥

